# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

## ५६ व्या दीक्षान्त समारंभाची सूचना

विद्यापीठाचा ५६ वा वार्षिक दीक्षांन्त समारंभ येत्या ऑक्टोबर २०१५ मध्ये करण्याचे योजीले असून **ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ व मार्च/एप्रिल २०१५** मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षा मधील यशस्वी स्नातंकाना सदर समारंभात पदव्यांचा अनुग्रह करण्यात येईल. या समारंभात उपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र प्राप्त करण्याकरीता आवेदन पत्रे मार्गविण्यात येत आहेत.

सदर समारंभात उपस्थित तसेच अनुपस्थित राहून पदवी प्राप्त करण्यासाठी पदवी आवेदन पत्रे सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक **३० ऑक्टोबर २०१५** राहील. सदर आवेदन पत्रे विद्यापीठाच्या प्रकाशन विक्री केंद्रात तसेच (www.bamu.ac.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संबंधीत अर्जासोबत सर्व गुणपत्रिकेच्या सांक्षाकित प्रती जोडणे आवश्यक असून पदवी शुल्क विद्यापीठाच्या लेखा विभागात स्वीकारले जाईल. तसेच पदवी आवेदन पत्रे टपालानेही स्वीकारले जातील. मात्र अशा अर्जासोबत पदवी शुल्काचा धनाकर्ष हा कुलसचिव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या नावाने काढलेला असावा.

१. ई-सुविधा मध्ये १६ अंकी पी.आर.एन. क्रमांकाने नोंदणी असलेले विद्यार्थी पदवीसाठी अर्ज फक्त ऑनलाइन पध्दतीनेच सादर करु शकतील. **(बी.ए./बी.कॉम./बी.एस्सी./बी.कॉम..(ई-कॉमर्स)/बी.सी.एस. व तत्सम अभ्यासक्रम व एम.ए., एम.कॉम. इत्यादी)**

२. यासाठी विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर जावून विद्यार्थ्यांनी आपले युजर नेम (गुणपत्रीकेवरील १६ अंकी पी.आर.एन. क्रमांक) व पासवर्ड टाकून Application या विभागामध्ये Convocation या लिंक वर जावून विद्यार्थी आपले ऑनलाईन अर्ज भरु शकतात व भरलेल्या अर्जाची Hard Copy आवश्यक त्या शुल्कासह विद्यापीठाकडे सादर करावेत.

३. ज्या विद्यार्थ्यांना आपला ई-सुविधा खात्याचा पासवर्ड माहिती नाही अशांनी वरील संकेतस्थळावरील Forget Passward या लिंक वर क्लिक करुन आपला १६ अंकी पी.आर.एन. क्रमांक, स्वत:ची जन्म तारीख व आपल्या आईचे नांव टाकून पासवर्ड प्राप्त करुन घ्यावा व आपले अर्ज भरावेत.

४. सदर अर्ज विद्यार्थी आपल्या संबधीत महाविद्यालयाच्या लॉगीन मधूनही ऑनलाईन सादर करु शकतील.

५. विधी/व्यवस्थापन शास्त्र/शिक्षणशास्त्र/अभियांत्रिकी/शारीरिक शिक्षण विद्याशाखेअंतर्गत असलेल्या सर्व अभ्यासक्रमाचे पदवी करीता प्रचलीत पध्दतीने आवेदन पत्र स्विकारले जातील.

विद्यार्थ्यांना समारंभास उपस्थित/अनुपस्थित राहून पदवी प्रमाणपत्र घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पुढे दिलेल्या तक्त्यानुसार पदवी शुल्क व टपाल खर्चासह दर्शविण्यात आलेले एकुण शुल्क भरणे अनिवार्य आहे :-

| पदवी प्रकार | महाराष्ट्रातील रहीवासी विद्यार्थ्यांना (स्पीड पोष्ट व्दारे) | महाराष्ट्राबाहेरील रहीवासी विद्यार्थ्यांना (स्पीड पोष्ट व्दारे) | भारताबाहेर वास्तव करणाऱ्या विद्यार्थ्यांना (एअर मेल व्दारे) |
|---|---|---|---|
| प्रथम पदवी | **२५०/-** | ३००/- | १३००/- |
| व्दितीय पदवी | **३५०/-** | ४००/- | १४००/- |
| एम.फील पदवी | **५५०/-** | ६००/- | १६००/- |
| पीएच.डी. पदवी | **६५०/-** | ७००/- | १७००/- |

उपरोक्त शुल्क तक्त्यात नमुद केलेले एकुण पदवी शुल्क अनिवार्य (टपाल खर्चासह) असून जे विद्यार्थी समारंभास गैरहजर राहतील, अशा विद्यार्थ्यांना त्यांचे पदवी प्रमाणपत्र समारंभानंतर एक महिन्याच्या कालावधीत त्यांनी आवेदन पत्रात नमूद केलेल्या पत्त्यावर स्पीड पोष्टाने पाठविण्यात येईल.

जे विद्यार्थी सदर समारंभापूर्वी पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करणार नाहीत अशांना तद्नंतर रुपये १००/- प्रथम वर्षास व तद्नंतर रुपये ५०/- प्रतिवर्षी प्रमाणे अधिकचा विलंब शुल्क भरावा लागेल. उक्त प्रमाणे शुल्क व तारखा केवळ ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१४ व मार्च/एप्रिल २०१५च्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी समारंभास अर्ज करता येईल.

**संदर्भ:क्रमांक /परीक्षा/पदवी/२०१५/** 4875-5274
**दिनांक ०५ सप्टेंबर २०१५**
**विद्यापीठ परीसर,**
**औरंगाबाद ४३१ ००४**

5.9.15
**(प्रा. प्रल्हाद लुलेकर)**
**परीक्षा नियंत्रक**

P.T.O

**या परीपत्रकाची एक प्रत माहीतीस्तव तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव खालीलप्रमाणे संबंधीताना पाठवण्यिात येत आहे.**

१. सर्व विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२. सर्व प्रशासकीय अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

३. संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपकेंद्र, उस्मानाबाद

४. सर्व प्राचार्य/संचालक, संलग्नित महाविद्यालये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

५. माहिती व जनसंपर्क अधिकारी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना देण्यात येवुन कळविण्यात येते की सदरील परीपत्रकास बातमी स्वरुपात विविध दैनिकाच्या सर्व आवृत्तीत प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी.

६. एमकेसीएल, ई-सुविधा केंद्र, विद्यापीठ परीसर यांना देण्यात येवुन विनंती करण्यात येते की, आपल्या संकेत स्थळावर या परीपत्रकास विशेष स्वरुपात प्रसिध्दी द्यावी.

७. विभाग प्रमुख, युनिक यांना देण्यात येवुन विनंती करण्यात येते की, सदर परीपत्रकास विद्यापीठाच्या संकेत स्थळावर विशेष प्रसिध्दी द्यावी.

5-9-15

(प्रा. प्रल्हाद लुलेकर)
परीक्षा नियंत्रक